फलोद्यान

# नवीन फळबाग लागवड करताना घ्यावयाची काळजी




प्रा. अमोल भुकन
(मो.नं. ९६८९५९२९७८)
उद्यानविद्या महाविद्यालय,
मालेगाव कॅम्प, जि. नाशिक












फळबाग लागवडीचा कालावधी दीर्घ असून सुरुवातीच्या काळामध्ये योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते. यासाठी जमिनीची निवड, मातीची तपासणी, फळपिकांच्या जातींची निवड, लागवडीचा आराखडा तयार करणे, रोपांचे वय, पाण्याची उपलब्धता, सेंद्रिय खते इत्यादी बाबींचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.

**फळ**बाग लागवडीसाठी उत्तम निचऱ्याच्या जमिनीची निवड करावी. जमिनीचा सामू साधारणतः ६.५ ते ७.५ दरम्यान असावा. हलकी ते मध्यम तसेच सर्वसाधारणपणे १.५ ते २.० मी. खोलीची जमीन फळबाग लागवडीसाठी योग्य असते. आंबा, लिंबू, मोसंबी, संत्रा, द्राक्ष या फळपिकांस चुनखडीविरहित (चुनखडीचे प्रमाण १०% पेक्षा कमी असलेली) असावी.

**माती परीक्षण :** फळबाग लागवड करण्याच्या अगोदर मातीचे परीक्षण करणे गरजेचे असते. मातीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण तपासून खतांच्या मात्रा देणे फायदेशीर ठरते. फळबाग लागवड करताना उथळ २५ सें.मी., मध्यम २५-५० सें.मी., खोल ५०-१०० सें.मी. या भागातील मातीपरीक्षण करावे. मातीचा नमुना माती परीक्षण केंद्रातून तपासून घ्यावा, त्यानुसार खताची मात्रा द्यावी.

**फळपिकांच्या जातींची निवड :** फळबाग लागवड करताना बहुतांश शेतकरी बांधव चुकीच्या जातीच्या रोपांची निवड करतात, त्या दृष्टीने रोपे खरेदी शासनमान्य रोपवाटिकेतून करावी. रोपे चांगल्या गुणवंत जातीची, भरघोस उत्पादन देणाऱ्या, रोग प्रतिकारक्षम असावीत. विविध वातावरणात येणाऱ्या जातींची निवड करावी.

**फळबागेला पाण्याची उपलब्धता :** बागायती फळझाडांना नियमित पाणी देण्याची गरज भासते. अशा बागायती फळझाडांची लागवड करताना पाण्याच्या उपलब्धतेनुसार लागवडीचे नियोजन करणे फायदेशीर ठरते. कोरडवाहू फळपिकांना लागवडीच्या सुरुवातीस पहिली तीन ते चार वर्षे चांगल्या व समाधानकारक वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असते. आपल्याकडे १२ महिने पाण्याची सोय असेल तर ज्या फळझाडांना बाराही महिने पाणी लागते, अशा फळझाडांची निवड करावी. आपल्याला पाणी आठ महिने पुरत असेल तर पेरू, चिकूसारखी फळझाडे लावावीत, पाणी फक्त सहा महिने पुरत असेल तर जांभूळ, चिंच, अंजीर, डाळिंब, सीताफळ, रामफळ, आवळा, बोर यासारख्या कोरडवाहू फळझाडांची लागवड करावी.

**खतांची उपलब्धता :** फळबाग लागवडीसाठी सुपीक जमिनीची आवश्यकता असते. फळपिकाच्या आवश्यकतेनुसार तसेच योग्य वाढीसाठी खतांची मात्रा देणे गरजेचे आहे.

**लागवडीच्या पद्धती :** फळबाग लागवड करताना योग्य पद्धत निवडावी. कारण याच गोष्टीवर फळझाडांचे उत्पादन, रोग आणि किडींचा प्रादुर्भाव अवलंबून असतो. कृषी विद्यापीठांच्या शिफारशीनुसार फळबाग लागवडीसाठी लागवड पद्धत आणि अंतर यांचे नियोजन करावे.

**१. चौरस मांडणी पद्धत**

(१) फळबाग लागवडीच्या चौरस मांडणी पद्धतीत बागेची जमीन चौरसामध्ये विभागण्यात येते. चौरसाच्या चारही कोपऱ्यांवर फळझाडे लावतात. त्यामुळे दोन ओळींतील आणि झाडांतील अंतर समान राहते.

(२) फळझाडांच्या दोन ओळी परस्परांना काटकोनात छेदतात. या पद्धतीमध्ये बागेची उभी-आडवी मशागत करणे सोपे जाते. दोन्ही दिशांनी झाडांना पाणी देता येते.

(३) या पद्धतीनुसार आंबा, पेरू, चिकू, लिंबू या फळपिकांची लागवड करणे सोपे जाते.

**२. आयत मांडणी पद्धत**

(१) यामध्ये चौरस पद्धतीपेक्षा थोडा बदल केलेला आहे. कारण दोन झाडांमधील अंतरापेक्षा दोन ओळींतील अंतर काही फळझाडांच्या बाबतीत जास्त ठेवावे लागते. दोन ओळींतील आणि झाडांतील अंतर समान राहत नाही.

(२) उदा. फळझाडांच्या दोन ओळींमध्ये ६ ते ८ फूट अंतर तर ओळीतील दोन फळझाडांमध्ये ३ ते ४ फूट अंतर असते. डाळिंब व द्राक्षाची लागवड कमी अंतर ठेवून आयताकृती पद्धतीने करावी लागते.

(३) या पद्धतीत चौरस पद्धतीचे सर्व फायदे मिळतात. मात्र बागेमध्ये मशागत करणे जरा अवघड जाते.

**३. सघन लागवड पद्धत**

(१) सघन लागवड पद्धतीने बरेच शेतकरी बांधव आंबा व पेरू लागवड करत आहेत. या पद्धतीने दोन्ही पिकांमध्ये ३ मी. x २ मी. अंतर ठेवून लागवड करतात.

(२) या लागवड पद्धतीमुळे एकरी झाडांची संख्या वाढते. परंतु या पद्धतीमुळे झाडांची छाटणी व वळण देणे हे दोन मुद्दे जर शास्त्रोक्त पद्धतीनुसार व्यवस्थित झाले, तरच झाडाची फळधारणा लवकर आणि भरपूर होते.

* पूर्वमशागतीची कामे झाल्यानंतर एप्रिल- मे महिन्यामध्ये फळझाडांच्या लागवड अंतराच्या शिफारशीनुसार योग्य लांबी, रुंदीचे खड्डे घेऊन हे खड्डे पोयटा माती, पालापाचोळा, शेणखत, जैविक खते,

## कृषी विद्यापीठ शिफारशीनुसार फळझाड लागवडीसाठी खड्ड्यांचा आकार आणि लागवडीचे अंतर

| अ.क्र | फळझाडांचे नाव | खड्ड्यांचा आकार | लागवडीचे अंतर |
|---|---|---|---|
| १. | आंबा | १०० x १०० x १०० सें.मी. | १० x १० मी., ९ x ९ मी., घन पद्धत ५ x ५ मी. |
| २. | चिकू | १०० x १०० x १०० सें.मी. | १० x १० मी., ८ x ८ मी. |
| ३. | पेरू | ६० x ६० x ६० सें.मी. | ६ x ६ मी., सघन पद्धत २ x १ मी. |
| ४. | डाळिंब | ६० x ६० x ६० सें.मी. | ४.५ x ३ मी. |
| ५. | द्राक्ष | – | ३ x १.५ मी. |
| ६. | केळी | – | १.५ x १.५ मी. |
| ७. | पपई | – | २.२५ x २. २५ मी. / २.५० x २.०० मी. |
| ८. | लिंबू | १०० x १०० x १०० सें.मी. | ६ x ६ मी. |
| ९. | मोसंबी | ७५ x ७५ x ७५ सें.मी. | ६ x ६ मी. |
| १०. | संत्रा | ७५ x ७५ x ७५ सें.मी. | ६ x ६ मी. |
| ११. | बोर | ६० x ६० x ६० सें.मी. | ६ x ६ मी. |
| १२. | अंजीर | ६० x ६० x ६० सें.मी. | ४.५ x ३ मी. |
| १३. | सीताफळ | ५० x ५० x ५० सें.मी. | ५ x ५ मी. |
| १४. | आवळा | ७५ x ७५ x ७५ सें.मी. | ७.० x ७.० मी. |
| १५. | नारळ | १०० x १०० x १०० सें.मी. | ७. ५ x ८ मी. |
| १६. | खजूर | १०० x १०० x १०० सें.मी. | ८ x ८ मी. |
| १७. | ड्रॅगन फ्रूट | – | ३ x ३ मी., ४ x ३ मी. |
| १८. | जांभूळ | ५० x ५० x ५० सें.मी. | ८ x ८ मी. |
| १९. | चिंच | १०० x १०० x १०० सें.मी. | १० x १० मी. |
| २०. | सफरचंद | ७५ x ७५ x ७५ सें.मी. | ७. ५ x ७. ५ मी. / ३ x ३ मी. |

ट्रायकोडर्मा, सिंगल सुपर फॉस्फेट, शिफारशीनुसार कीडनाशक पावडर यांच्या मिश्रणाने भरून घ्यावेत.

* फळबाग लागवडीसाठी खड्डे खोदण्यापूर्वी कोणत्या लागवड पद्धतीने लागवड करावयाची आहे, यानुसार खड्डे खोदून घ्यावेत. प्रत्येक पद्धतीत दोन झाडांतील अंतर आणि दोन ओळींतील अंतराप्रमाणे खड्डे तयार करावेत.

* लागवड करण्यापूर्वी कलमाच्या पिशव्या अलगद उचलून दोन्ही बाजूंवर उभा काप द्यावा. मुळांभोवती असलेला मातीचा गोळा न फुटता पॉलिथिन बॅग काढावी. मोकळा झालेला गोळा दोन्ही हातांत धरून खड्ड्याच्या मधोमध ठेवून हलकेच दाबावा. मोकळ्या हाताने माती भरून गोळ्याभोवती माती टाकावी. अगोदर हाताने व नंतर पायांनी दाबावी, हे करताना मातीच्या गोळ्यावर पाय पडणार नाही याची काळजी घ्यावी. आवश्यकता वाटल्यास हलकेसे पाणी द्यावे. आधारासाठी पश्चिम बाजूस ६ इंच अंतरावर ४ ते ५ फूट बांबूची काठी रोवून त्याला कलमे बांधावी. ■